| नियमित दिवाणी दावा क्र.१०१५/२०२३ मधील निशाणी क्र.२० खालील आदेश रेखा उर्फ कुसुमबाई नामदेव गोरे विरुध्द छाया सिताराम घोरपडे व इतर. | MHAH140014252023 |
|---|---|

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्यास झालेला उशिर माफ करावा व दिनांक २०/०३/२०२४ रोजी झालेला विना म्हणणेचा आदेश रद्द करण्यात यावा याकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जासोबत प्रतिवादीचे शपथपत्र जोडलेले आहे.

२. प्रतिवादींने सदर अर्जात कथन केले आहे की, सदर दाव्यातील प्रतिवादी यांना दाव्याचे समन्सची बजावणी झालेली असून सदर प्रतिवादी यांना महत्वाचे कागदपत्र वेळेत न मिळाल्याने प्रतिवादी हे कायदयाप्रमाणे निर्धारीत वेळेत त्यांची कैफियत दाखल करु शकले नाहीत. म्हणुन मे. कोर्टाने प्रतिवादींविरुध्द दिनांक २०/०३/२०२४ रोजी विना म्हणणेचा आदेश पारीत केलेला आहे. सदर प्रतिवादी यांना कैफियत देणेसाठी योग्य व रास्त कारणाने उशिर झालेला असून प्रतिवादींना झालेला उशिर माफ न झाल्यास प्रतिवादीचे नुकसान होणार आहे. सबब, अर्ज मंजुर करण्यात यावा.

३. वादीने सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन कथन केले आहे की, दाव्याचे कामकाज लांबविण्याकरीता प्रतिवादी हे असे कृत्य करुन मे कोर्टासमोर कुठलेही सुसंगत असलेले कारण न दाखवता खोटे अर्ज देत आहे. प्रतिवादी यांना वेळोवेळी संधी देवूनही

त्यांना नोटीस लागल्यापासुन मे. कोर्टात हजर झाले नाही. उलट मे. कोर्टाने त्यांचेविरुध्द आदेश केल्यावर हजर झाले आहे. अर्जात असे कोणतेही कारण स्पष्ट नाही. त्यामुळे अर्ज रद्द करण्यात यावा. तसेच प्रतिवादी २ व ४ यांना जास्तीत जास्त दंड आकारण्यात यावा.

४. सदरचा अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.२ व ३ यांच्याविरुध्द दिनांक ०७/१२/२०२३ रोजी एकतर्फा आदेश पारीत केलेला आहे. प्रतिवादींनी अर्जात नमुद केल्याप्रमाणे दिनांक २०/०३/२०२४ रोजी या प्रतिवादींविरुध्द कोणताही आदेश पारीत केलेला नाही. त्यामुळे प्रतिवादीने अर्जात केलेल्या दिनांक २०/०३/२०२४ रोजीचा विनाम्हणणे आदेश रद्द करण्यात यावा या मागणीच्या अनुषंगाने तसा कोणताही आदेश पारीत करता येत नाही.

५. परंतु, दिनांक ०७/१२/२०२३ रोजी या प्रतिवादींविरुध्द एकतर्फा आदेश पारीत केलेला आहे. तो आदेश रद्द करावा अशी देखील प्रतिवादींची मागणी आहे. त्याकरीता प्रतिवादींने प्रस्तुत अर्जात कागदपत्र न मिळाल्याचे कारण नमुद केले आहे. परंतु, सदर कारणाच्या पुष्टयर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. असे असले तरी देखील प्रस्तुत दावा हा सरस निरस मानाने वाटप, निरंतर ताकिद मनाई हुकुमासाठी व जाहीर ठराव होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे. त्यामुळे दावा पुर्णतः निकाली काढणेकरीता दोन्ही बाजुंचे म्हणणे व पुरावा अभिलेखावर असणे आवश्यक

आहे. तसेच नैसर्गिक न्यायतत्वानुसार प्रतिवादींना त्यांचे म्हणणे दाखल करण्यास परवानगी देणे योग्य ठरेल. म्हणुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. प्रतिवादी क्र.२ व ३ यांच्याविरुध्द दिनांक ०७/१२/२०२३ रोजी झालेला एकतर्फा आदेश दंड रक्कम रुपये ५००/– आकारुन रद्द करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी दंडाची रक्कम वादीला पुढील तारीख किंवा तत्पुर्वी दयावी. तद्नंतर प्रतिवादी क्र.२ व ३ यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात येईल.

SANDHYA YUVRAJ SUL
Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2024.11.19 17:29:04 +0530

(**संध्या यु. सुळ**)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश,
क.स्तर, नेवासा

ठिकाण – नेवासा
दिनांक – १९/११/२०२४